# स्वातंत्र्यवीर सावरकरांचे राष्ट्रवादासंबंधी विचार

**कुणाल दिलीप राठोड** (संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र विभाग) प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती, 444 708

---

प्रास्ताविक :

'कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रात जेव्हा व्यक्ती स्वातंत्र्याची योग्य पाठराखण होऊ लागते, तेव्हाच ते राष्ट्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र बनते.' असे 18 व्या शतकात इमॅन्युएल कान्ट नावाच्या जर्मन तत्ववेत्याने म्हटले होते. हा कांट म्हणत असे की, कोणत्याही व्यक्तीच्या मनात स्वतःच्या काही उपजत प्रवृत्ती विरुद्ध संघर्ष सुरू असतो, त्यातूनच त्या व्यक्तीच्या अशा आकांक्षांना एक नैतिक आशय प्राप्त होतो. म्हणजे व्यक्तीच्या अनुभूतींमधूनच जगण्यासाठीची नैतिक मूल्य आणि नीतिमत्ता ही जन्म घेत असतात. व्यक्ती व्यक्तींच्या आशा - अनुभूतींसाठी समाजात व्यक्ती स्वातंत्र्य असणे गरजेचे असते. व्यक्ती स्वातंत्र्याच्या संकल्पनेला जेव्हा सामूहिक स्वरूप प्राप्त होते, तेव्हा त्यातूनच राष्ट्र स्वातंत्र्याच्या अस्मितेचा जन्म होतो. आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या अस्मितेलाच 'राष्ट्रवाद' असे म्हणतात. आता भारताच्या संदर्भात राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांचा इतिहास काय आहे हे आपण स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राष्ट्रवादाचा अभ्यास करून या शोध निबंधात मांडणार आहोत.

शोध निबंधाची उद्दिष्टे : स्वातंत्रवीर सावरकर यांच्या राष्ट्रवादासंबंधी विचारांचे अध्ययन करणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोध निबंध अध्ययनासाठी दुय्यम स्रोतांचा वापर करून त्याचे संकलन करण्यात आले आहे. अध्ययन विषयाची संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित असलेले शोध अध्ययन, संदर्भ ग्रंथे , मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम स्रोतांच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेली आहे.

आशय विश्लेषण:

ब्रिटिशांच्या राजवटीतून भारत जेव्हा स्वतंत्र झाला, तेव्हा प्रथमच या देशाला 'आसेतु हिमालय' हे स्वरूप मिळाले. त्यानंतर एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून उभे राहताना विकासोन्मुख आणि न्यायाधिष्टित समाज रचना निर्माण करणे, आणि जागतिक शांतता व सहकार्य साध्य करणे हे महत्त्वाचे होते. त्यासाठी देशाने जे संविधान स्वीकारले, त्यात स्वतंत्र, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता ही मुल्ये आजच्या राष्ट्रवादाची घोतके म्हणून घोषित झालेली आहेत. त्यामुळे राष्ट्रवादाची सांगड धर्माशी न घालता उपरोक्त संविधानिक मूल्यांशी घालने हे महत्त्वाचे आहे.

'परकियांची आक्रमणे ही केवळ राजकीय नसून सांस्कृतिक आक्रमणे होती', असे सावरकर यांनी सांगणे. भारतावर यवन, ग्रीक, शक, हूण, मुसलमान आणि इंग्रज यांनी जी आक्रमणे केली, त्यांपैकी पहिली ४ आक्रमणे ही केवळ राजकीय होती. 'उरलेली २ म्हणजे मुसलमान आणि इंग्रज यांची आक्रमणे ही केवळ राजकीय नव्हे, तर सांस्कृतिक आक्रमणेही होती', हा मोलाचा सिद्धांत स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी त्यांच्या 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथात मांडला. मुसलमान आणि इंग्रज या आक्रमकांना भारतात राजकीय सत्ता राबवतांना भारतातील संस्कृती, धर्म, कला अन् भाषा इत्यादी समाजाची अस्मिता नष्ट करावयाची होती. समाजातील दोषांचा लाभ उठवून हिंदूंना बाटवून हिंदूंची संख्या अल्प करायची आणि आपल्या समाजाची संख्या वाढवायची, असा उपक्रम मुसलमान अन् इंग्रज म्हणजेच ख्रिस्ती यांनी चालू केला. एका विचारवंताने ख्रिस्त्यांच्या या उपक्रमाचे मार्मिक वर्णन चांगल्या पद्धतीने केले आहे. 'ख्रिस्ती येथे आले, तेव्हा त्यांच्या हातात बायबल नि आमच्या हातात सत्ता होती. आता आमच्या हातात बायबल नि ख्रिस्त्यांच्या हातात सत्ता आहे.'

राष्ट्रवादाचा अभ्यास करतांना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राष्ट्रवादाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारत एक आधुनिक नवराष्ट्र म्हणून निर्माण होण्याच्या प्रक्रियेत सावरकरांचे जे द्रष्टेपण सिद्ध झाले, ते भारताच्या इतिहासातील भारतीयांच्या बौद्धिक संपदेचा सर्वश्रेष्ठ ठेवा म्हणता येईल.

हिंदूंनी स्वतंत्र भारत एकात्म, विज्ञाननिष्ठ आणि विजिगिशु कसा घडवला पाहिजे याचे स्पष्ट दिग्दर्शन सावरकरांनी ' हिंदुत्व ' या ग्रंथातून केले आहे. रत्नागिरीतील स्थानबद्ध्दतेच्या काळात त्यांनी प्रत्यक्ष आचरणाने जातीभेदातील उच्चनीचितीची विषारी नांगी मोडून दाखविली. अस्पृश्यतेला हिंदू मानसिकतेतून सीमापार करण्यासाठी प्रयत्न केले. आपण स्वयंसिद्ध आणि निर्भयतः परिपूर्ण राष्ट्र आहोत, हे आत्मभान प्रखर करत हिंदुत्वाचे तत्त्वज्ञान निर्माण केले. ते तत्त्वज्ञान जगणाऱ्या संन्यस्थ योध्यांची तेजस्वी आणि अखंडित परंपरा प्रचलित करून त्यांनी त्यांची दोन क्रांती केल्या. पहिल्या क्रांती विषयी सांगायचे तर सावरकर बंधूंनी सर्वप्रथम संपूर्ण स्वातंत्र्याचा उद्घोष नाशिक येथे 1900 सालि ' मित्रमेळा ' या त्यांच्या संघटनेच्या व्यासपीठावरून केला. त्यासाठी सशस्त्र क्रांती अपरिहार्य आहे, हे त्यांनी आवर्जून सांगितले. त्यांनी

सशस्त्र क्रांतीचे सर्वांगीण तत्त्वज्ञान निर्माण केले. क्रांती संबंधित हिंसेला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. क्रांतीचा स्वातंत्र्यशी आणि स्वतंत्र्याचा मानवी हिताशी म्हणजे मनुजमंगलाशी अशी अपरिहार्य संबंध कसा आहे, हे त्यांनी दाखवून दिले.

सत्व आणि सत्वाच्या रक्षणार्थ गाजवावे लागणारे शौर्य उदात्त मूल्यांची क्रांती गीता सांगणारे सावरकर दार्शनिक आहेत. त्यांना पारतंत्र्याची चीड होती, स्वातंत्र्याची दुर्दम्य इच्छा होती आणि त्यासाठी शस्त्र चालविण्याचा त्यांचा निर्धार होता. सावरकरांनी हिंदुत्व आणि हिंदू राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान निर्माण करून दुसरी क्रांति केली. आज हिंदुत्वास देशात जी सर्वसामान्य व प्रतिष्ठा मिळत आहे, त्यास सावरकरांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे ' एडवर्डला घालवून औरंगजेबाला गादीवर बसविण्यासाठी क्रांतिकारकांनी आपल्या रक्ताने फाशीचे खांब भिजविलेले नाहीत '. असे बजाव सावरकरांनी हिंदूंना ते ' स्वयंमेव राष्ट्र ' म्हणून प्राचीन काळापासून अभिमानाने आणि वैभवाने कसे जगत आले आहेत, याची सोदाहरण जाणीव करून दिली. संयुक्त राष्ट्र संघाने एखाद्या समाजास राष्ट्रीयत्वाची पदवी प्राप्त होण्यासाठी जे आधुनिक निकष ठरविले, ते लागू केल्यावरही हिंदूंना राष्ट्र म्हणून उभे राहण्याचा कसा निसर्गदत्त अधिकार आहे, हे सप्रमाण दाखवून दिले.

हिंदू राज्यकर्ते प्रारंभा पासून आपले प्रशासन धर्मनिरपेक्ष राखण्यात यशस्वी झाल्याची साक्ष सावरकरांनी आपल्या साहित्यातून व वाणीतून दिली. आधुनिक पाश्चिमात्य विचारवंतांचे संशोधन या सिद्धांतात सिद्धांतास पुष्टी देत असल्याने हिंदुत्वाच्या शासन प्रणालीत सर्व धार्मिक अल्पसंख्यांक उपयुक्त अवस्थेत राहू शकतात. पण जर हिंदुत्वाचा आणि हिंदू राष्ट्रवादाचा त्याग केला तर मुस्लिमांचा अलगतावाद दूर करून राष्ट्राची सार्वभौमता , स्वतंत्रता ,सुरक्षितता आणि एकात्मता अबाधित ठेवण्यास ' हिंदी राष्ट्रवाद ' जो भ्रांत होता. कार्यवाहीत आणला तर तो अयशस्वी ठरेल आणि परिणामी ' अखंड भारताचे ' ' अखंड पाकिस्तान ' करण्याची प्रक्रिया सुरू होईल ही प्रक्रिया खंडित करता येणार नाही, हा धोका सावरकरांनी फाळणीपूर्वीच दाखवला होता.

या दृष्टीने स्वातंत्र्यवीर सावरकरांचा हिंदुत्ववाद आणि हिंदुराष्ट्रवाद नेमका काय आहे, हे समजावून सांगावे लागेल. पहिली गोष्ट म्हणजे सावरकरांचे हिंदुत्व धर्मनिरपेक्ष आहे. ज्यामुळे एकत्वाची जाणीव निर्माण होते ते राष्ट्रीयत्व असेल तर सावरकरांचे हिंदुत्व समान परंपरा, समान इतिहास, समान भूतकाळ आणि भविष्यकाळाची समान स्वप्ने, समान भाषा इत्यादी अनेक सामायिक तत्त्वांवर उभे आहे. ते श्रुतिस्मृतिपुराणोक्त नाही. सावरकरांचे हिंदुत्व म्हणजे पूजापाठ, व्रतवैकल्ये, जानवे, स्तोत्रपठण, घंटा, धोतर नाही. ते जातपात न मानणारे, अस्पृश्यतेचे समूळ निर्मूलन करणारे आहे. ते यंत्रयुगाविषयी स्वागतशील आहे. त्याचा औद्योगिकीकरणाला पाठिंबा आहे. विज्ञान वरदान आहे, असे ते मानते. देश संरक्षणदृष्ट्या समर्थ झाला पाहिजे, असे ते सांगते. त्यांचे हिंदुत्व अध्यात्म हा वैयक्तिक अनुभवाचा विषय समजून समाजाच्या प्रगतीसाठी भौतिकशास्त्राचा आधार घेतला पाहिजे, असा आग्रह धरणारे आहे. ते मानवतावादी आहे. विजिगीषू आहे. ते संकल्पनेत तर्काने आणि न्यायतत्त्वाने हिंदुराष्ट्र असले तरी व्यवहारात समूर्त होताना ते हिंदी राज्याचा अवतार घेऊन प्रकट होणारे आहे. हिंदुराष्ट्राच्या हिंदी राज्यात सर्वांना विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने लोकसत्ताक समान अधिकार असतील, असे सांगणारे आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' ही घोषणा हे त्याचेच एक प्रतीक आहे. सावरकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदु महासभेच्या व्यासपीठावरून अनेक भाषणे केली, त्यात लोकशाहीचा पुरस्कार, 'दरडोई एकमत' असे उल्लेख अनेकदा केल्याचे आढळते.

स्वातंत्र्यवीरांनी १९२४ ते १९३७ या १३ वर्षांत रत्नागिरीतील हिंदु समाज एकसंध, सामर्थ्यशाली आणि विज्ञाननिष्ठ होण्याच्या दृष्टीने काय सुधारणा करता येतील याचा विचार केला. त्यांनी परधर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदु धर्मात येण्याचा मार्ग प्रशस्त केला. ज्यात्युच्छेदन आणि अस्पृश्यता निवारण केले. अंधरूढींचे निर्मूलन केले, कालबाह्य रूढींवर कठोर प्रहार केला. भाषाशुद्धी केली. बलोपासना उपदेशिली. विज्ञाननिष्ठा रुजविली. हिंदुंमध्ये बंधुभाव वाढीस लागेल, असे कार्यक्रम घेऊन सावरकरांनी प्रचाराचा धुमधडाका केला. जातिभेदाची निर्मिती एखाद-दुसऱ्या जातीने केली नसून सर्व समाज या दोषात वाटेकरी आहे, असे त्यांचे मत होते. जातिव्यवस्थेने जी जन्मजात उच्चनीचता समाजात प्रचलित होते, ती आपण मानणार नाही, असा मनोनिग्रह हिंदुंनी केला पाहिजे आणि सर्व जातींना विकासाच्या संधी आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ही त्यांची भूमिका होती. महार मांगाच्या हातचे आणि मांग चांभाराच्या हातचे पाणी पीत नाही, हे लक्षात आणून देऊन उच्चनीचतेच्या आणि अस्पृश्यतेच्या भावनेने संपूर्ण हिंदु समाजाला ग्रासले आहे, तेव्हा उच्चनीचता आणि अस्पृश्यतेच्या विचारांचा अतिरेक अन्न आणि पेय प्राशन करताना सोडला पाहिजे. त्यामुळे हिंदु समाज एकजीव होण्याच्या अभिसरणाला गती मिळेल. इतर धर्मात गेलेल्यांना सन्मानाने पुन्हा हिंदु धर्मात आणण्याची शुद्धी चळवळ हिंदुंनी निष्ठापूर्वक हाती घेतली तर हिंदुंमधील उपेक्षित वर्गाचे भक्षण करण्याची जी लालसा राजकीय महत्त्वाकांक्षेने अन्य

धर्मीयांमध्ये उत्पन्न होते तिची तीव्रता कमी होईल, असे सावरकर सांगत. जातिभेद, अस्पृश्यता ही विकृती शस्त्रक्रियेने उपटून टाकल्यावर हिंदु समाजपुरुषाची प्रकृती निरोगी होईल, असे ते म्हणत.

निष्कर्ष :

सावरकरांना अपेक्षित असणारा राष्ट्रवाद हा आपण नीट समजून घेण्याची गरज आहे. राष्ट्रीय सुरक्षेशी कधीच तडजोड नसलेला, चांगले प्रशासन असलेला आणि धर्माचा अतिरेक नसलेला असा राष्ट्रवाद व नो कॉम्प्रोमाईज्ड हिंदुत्व त्यांना अपेक्षित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे भारतीय राष्ट्रसुरक्षेचे पिता असून त्यांनी विभाजनापूर्वी, विभाजनासंबंधात वेळोवेळी इशारे दिले होते. पाकिस्तानची निर्मिती झाल्याने भारताला भविष्यात शांततेने झोप लागणार नाही, असेही त्यांनी सांगितले होते. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांचा हिंदुत्ववाद हाच राष्ट्रवाद होता, चीनच्या आक्रमणाबाबतही त्यांनी चार वर्षे आधीच इशारा देऊन सावध केले होते. सैनिकीकरणाबाबत सावरकरांनी दिलेले मार्गदर्शन मोलाचे आहे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने हिंदुराष्ट्र निर्मितीचे स्वप्न साकार होईल. हिंदुराष्ट्रात सर्व जाती, धर्मांच्या लोकांना समान अधिकार असतील. अल्पसंख्याकही त्यांच्या पूजा-अर्चा करू शकतील; मात्र हिंदुराष्ट्रात अन्य धार्मिक राष्ट्रे बनण्याची परवानगी देणार नाही. राष्ट्रवादी मुसलमानांना हिंदुराष्ट्रात जागा आहे, असे स्वातंत्र्यवीर सावरकर हे हिंदू महासभेचे अध्यक्ष झाले तेव्हा लोकांना त्यांनी कर्णावती येथील अधिवेशनातही हिंदुत्व म्हणजे काय, ते स्पष्टपणे सांगितले होते. स्वातंत्र्यासाठी आमच्यासोबत काम करू इच्छिणाऱ्या मुसलमानांचे स्वागत आहे. मात्र ते नसतील तर त्यांच्याविना आम्ही स्वातंत्र्यासाठी संघर्ष करू, असे त्यांनी स्पष्ट केले होते. हिंदू-मुसलमान ऐक्यासाठी काँग्रेसने मुसलमानांचे लांगुलचालन केले. मुस्लिम लीगने त्याचा फायदा उठविला. सावरकरांनी सतत इशारे दिले. मात्र काँग्रेसने ऐकले नाही. काँग्रेसने त्यांचे ऐकले असते तर फाळणीही टळली असती, सावरकरांनी आपल्या साहित्यातून, लिखाणातून हिंदू धर्माबाबतचे त्यांचे विचार वेळोवेळी प्रतिपादित केले आहेत.

संदर्भ :

1. साठे रवींद्र - 'राष्ट्रभाव ! सावरकरांच्या राष्ट्रवादाची प्रचिती...?' - Loksatta.com - 27 मे 2022.
2. महुरकर उदय - 'स्वातंत्रवीर सावरकरांचा हिंदुत्ववाद, हाच राष्ट्रवाद होता ' - lokmat.com - 10 मे 2021.
3. ओबेराय डॉ. हरवंश लाल - 'मासिक सावरकर टाइम्स',- मे २०११
4. स्वातंत्रवीर सावरकर : राष्ट्रवाद ते मानवतावाद - hindusthanpost.com - 26 फेब्रुवारी 2023